# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 14/01/2021 (गुरूवार)
(सकाळ)

---

### विनयभंग

पो.स्टे. जलालखेडा :– दि. 12/01/2021 चे 10:30 वा. ते 10:45 वा. चे सुमारास 40 वर्षीय पिडीत/फिर्यादी या हि शेतात पायदळ जात असतांना आरोपी नामे– सुधाकर सावरकर, रा. दावसा ता. नरखेड जि.नागपुर याने तिला "चल माझ्या गाडीवर बस, मी तुला शेतात सोडुन देतो" असे म्हटले असता फिर्यादी ही आरोपी याचे गाडी वर बसुन तिचे शेता जवळ उतरली असता फिर्यादीने आरोपीस "तुम्ही तुमचे शेतात जा" असे म्हटले. यानंतर आरोपीने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 354 (अ)(2)(3) भादंवि. सहकलम अनुसुचित जाती/अनुसुचीत जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी काटोल विभाग श्री नागेश जाधव हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर